# नियमित दिवाणी दावा क्रं.१५/२०२१ मधील
# नि.क्र.१८ व १९ वरील संयुक्त आदेश

प्रतिवादी क्र.१ ते ८ तर्फे प्रस्तुत अर्ज हा लेखी कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करण्याकरीता दाखल केला आहे.

२ अर्ज व त्यावरील म्हणण्याचे अवलोकन केले. त्याचप्रमाणे दोन्ही बाजुचा युक्तीवाद विचारात घेतला. सदर प्रतिवादींचे कथन असे की, वादी यांनी सदरचा दावा प्रतिवादी विरूद्ध कायम मनाईसाठी दाखल केला आहे. सदर प्रकरणात प्रतिवादी यांना मुदतीत कागदपत्रांच्या नकाला उपलब्ध न झाल्यामुळे तसेच कोवीड–१९ चा प्राद्रुर्भाव असल्याने लॉकडाउन होते त्यामुळे त्यांना कागदपत्रे वेळेत जमा करता आली नाही. त्यामुळे त्यांच्या विरुध्द दिनांक २२/०६/२०२१ रोजी विना कैफीयत आदेश पारीत झालेला आहे. तो रद्द होणे न्यायाचे व गरजेचे आहे. तसे न झालेस यातील प्रतिवादी यांना आपली बाजू मे. कोर्टासमोर मांडता येणार नाही व त्यामुळे सदरचा दावा गुण दोषावर चालवणेस अडचण निर्माण होणार आहे. तसेच सदरचा दावा विना कैफियत आदेश रद्द न झालेस प्रतिवादी यांचेवर अन्याय होणार आहे. सदरचा दावा एकतर्फी चालवणेचा आदेश रद्द न झालेस यातील प्रतिवादी यांचे कधीही न भरून येणारे अपरिमीत असे नुकसान होणार आहे. त्यामुळे प्रतिवादींनी विना कैफियत आदेश रद्द होवून अर्जासोबत दाखल केलेली कैफियत स्वीकारण्यात यावी अशी विनंती केलेली आहे.

३ याउलट वादीने सदर अर्जावरच म्हणणे दाखल केले व प्रतिवादींनी अर्जात नमुद केलेले कारण संयुक्तीक नाही अशी हरकत घेवून अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

४ न्यायालयीन अभिलेखाचे अवलोकन केले असता प्रस्तुत दावा हा वादी यांनी प्रतिवादींविरूद्ध कायम मनाईसाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी यांना दिनांक ०२/०२/२०२१ रोजी दावा समन्स बजावले. सदर कामी प्रतिवादी हजर झाले परंतु वेळेत कैफीयत दाखल न केल्यामुळे दिनांक २२/०६/२०२१ रोजी त्यांच्या विरुध्द विना कैफीयत आदेश पारीत झालेला आहे. सदर प्रतिवादीतर्फे अर्जातील नमुद कारणे ही योग्य व समाधानकारक दिसून येतात. तसेच वादी व प्रतिवादी दोघांचेही कायदेशीर हक्क व अधिकार दाव्यामध्ये गुंतलेले आहेत. प्रस्तुत अर्ज जर नामंजूर केला तर तुलनात्मक दृष्टया प्रतिवादीचे जास्त नुकसान होणार आहे. तसेच नैसर्गिक न्यायदानापासून प्रतिवादीना वंचित रहावे लागणार आहे. प्रस्तुत अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादीना कैफियत देण्याची संधी मिळणार आहे. तसेच दावा गुणदोषावर चालवून निकाली होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे प्रतिवादीना त्यांची कैफियत दाखल करण्याची संधी देणे योग्य व संयुक्तीक आहे.

दिवाणी प्रक्रिया संहिता १५१ व्दारे न्यायालयास निहीत करण्यात आलेल्या अंगभूत शक्तीचा वापर करून प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे न्यायोचीत होणार आहे. करीता प्रस्तुत अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. तसेच प्रस्तुतचा अर्ज देण्यास विलंब केल्यामुळे जो वादीस असोयीस्करपणा झाला त्याकरीता सदर प्रतिवादीना खर्च लावल्यास योग्य व संयुक्तीक आहे. करीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

## आ दे श

प्रतिवादी क्रमांक १ ते ८ यांनी पुढील नेमलेल्या तारखेच्या आत प्रत्येकी रक्कम रुपये १००/-(शंभर रूपये) वादीला देणेचे अटीवर अर्ज मंजूर करण्यात येतो.

दि.३०/०९/२०२१
अंबड

**(डी.एम.गायकवाड)**
४थे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
अंबड